६ || प्रभात पुणे, रविवार, दि. ४ फेब्रुवारी २०२४

# 'हुतात्मा राजगुरूंचा वारसा विद्यार्थ्यांनी चालवावा'

**राजगुरूनगर, दि. ३ (प्रतिनिधी)** - देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणाऱ्या हुतात्मा राजगुरूंच्या विचारांचा, कर्तृत्वाचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे चालवावा, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा.व्ही. बी. दौंडकर उपस्थित होते.



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की,विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा आदर करावा.आपले सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी स्वत: प्रयत्न करावेत.

क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग तसेच विविध शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. मीनाक्षी साळुंखे, सृष्टी बोऱ्हाडे, आदिल सिकीलगार, तनिष्का काळे, सुमित इंगोले, निरंजन कोरडे, तेजस देसले, तेजस्विनी गौड, अक्षदा कोळेकर यांच्यासह पीएच. डी. प्राप्त प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला. अहवाल वाचन प्राचार्य. डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, पारितोषिक वाचन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा. दिलीपकुमार गुप्ता यांनी, तर आभार उपप्राचार्य प्रा.व्ही.बी. दौंडकर यांनी मानले.